**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com***
*PEER REVIEWED JOURNAL, AUG-SEPT 2018, VOL- 6/29*

# माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व शिक्षणाचा अभ्यासक्रम यामधील सहसंबंध : एक चिकित्सक अभ्यास

एस. के. पाटील, Ph.D.
प्राचार्य, श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ एज्युकेशन, कमलापूर. ता. सांगोला जि. सोलापूर
ई-मेल- *sajik.k.patil@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :-**

आज सर्वच क्षेत्रात बदल झपाट्याने होत आहेत. शिक्षण क्षेत्र ही यापासून दूर नाही. शिक्षक प्रशिक्षण पूर्ण करून गेलेला विद्यार्थी प्रत्यक्ष नोकरीत जातो, त्यावेळी अनेक बदलग् त्याला स्वीकारावे लागतात. याचाच भाग एक म्हणजे ' तुम्हाला सराव पाठ घेताना जसे नियोजन करून पाठ घेता आले तसे आता करता येणार नाही, एकाच मुद्द्यावर ती तासभर चर्चा करता येणार नाही' असा सल्ला त्या शाळेतील अनुभव शिक्षकाकडून या नव्या शिक्षकाला मिळतो. तेच फार उत्साहाने पळू नका, उगाच अनेक विविध कार्यक्रम करता येतात असा उत्साह दाखवू नका आणि विशेष म्हणजे आमच्या मुख्याध्यापकांच्याग् डोक्यात तरी असे उपक्रम घालू नका. आम्हाला आमचे दररोजचे काम जास्त झाले आहे असे मार्गदर्शन व सल्ले घेऊन हा नवखा शिक्षक भांबावूनच जातो. त्याच्या मनात पहिला प्रश्न उभा राहतो तो हा की, प्रशिक्षणात आम्हास इतकं काही शिकलं त्याचं काय करायचं? आता आपणाला या अनुभवी लोकात राहताना याचं ऐकावंच लागेल? अशा प्रकारच्या पार्श्वभूमीवर माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व शिक्षक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम यांचा सहसंबंध पाहणे फार महत्त्वाचे वाटते.

**संशोधन विषय :-**

' माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व शिक्षक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम यामधील सहसंबंध : एक चिकित्सक अभ्यास'

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. बी. एडचा सैतान्तिक भाग व माध्यमिक शिक्षणाचा सैदांतिक भाग याचा सहसंबंध तपासणे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

2. बी एडमधील प्रात्यक्षिक कार्य व माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्य यांच्या सहसंबंधाची चिकित्सा करणे.

**संशोधनाची गृहीतके :-**

1. बी. एड प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम व माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम यांचा घनिष्ठ संबंध आहे.

2. बी. एड अभ्यासक्रम चांगल्या प्रकारे अभ्यासल्याने माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम अध्यापनास सांगली मदत होते.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. माध्यमिक शाळेवरती अध्यापन करणाऱ्या शिक्षकाकडून प्रश्नावली या साधनाच्या साहित्याने माहिती संकलित करण्यात आली आहे.

**नमुना निवड :-**

प्रस्तुत संशोधनासाठी सांगोला तालुक्यातील दोन माध्यमिक शाळातील 20 शिक्षकांची सप्रयोजन न्यादर्शनाने निवड करण्यात आली आहे.

**माहिती संकलनाचे साधन :-**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली व मुलाखतीचा वापर केला आहे. संशोधकाने उद्दिष्टावर आधारित सात प्रश्नांचा वापर केला व अनौपचारिक प्रकारे मुलाखती घेतल्या.

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-**

1. बी एड अभ्यासक्रमातील तत्त्वज्ञानाचा माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाशी कसा संबंध आहे? या प्रश्नाला पुढील प्रमाणे प्रतिसाद मिळाले -

आम्ही शिक्षक म्हणून कसे वागावे, आमच्या प्रत्येक कृतीला तात्विक आधार असावा, पाठ्य घटकातून मूल्यांचा संस्कार कसा करावा, सहकार्यामध्ये व समाजामध्ये कसे संबंध विकसित करावे, आदर्श नागरिक कसा असावा,

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

इत्यादी बाबींची माहिती मिळाली या सर्व बाबींचा माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाशी प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष संबंध आहे, असे मत 100% शिक्षकांनी नोंदवले.

2. बी. एड अभ्यासक्रमातील मानसशास्त्राचा माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाशी कसा संबंध आहे ? या प्रश्नासाठी पुढील प्रमाणे प्रतिसाद मिळाला -

किशोर व कुमार वयातील मुलांच्या मनस्थितीचा व मानसिक विकासाचा अभ्यास झाल्याने त्यांच्याशी कसे वागावे ? त्यांच्या मनाचा आदर कसा करावा, सर्वांना समान संधी द्यावी, हे समजलं चांगल्या अध्ययनासाठी अवधान, प्रेरणा, थकवा, अभिरुची इत्यादींचे महत्त्व समजले या सर्वांचा माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाशी प्रत्यक्ष संबंध आहे असे मत 100% शिक्षकांनी नोंदविले.

3. बी. एड अभ्यासक्रमातील मूल्यमापनाचा माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाशी कसा संबंध आहे ? या प्रश्नासाठी पुढील प्रमाणे प्रतिसाद मिळाला -

वार्षिक नियोजन, मासिक नियोजन, घटक नियोजन, घटकांच्या अध्यापनाची उद्दिष्टे म्हणजे अगोदर कशासाठी शिकवावे? कसे शिकवावे? आणि त्यानंतर शिकवलेले सफल झाले का? इत्यादी माहिती आम्हास मूल्यमापन विषयानेच दिली याचा वापर आम्ही आमच्या दैनंदिन अध्यापनात करतो आमच्या अभ्यासक्रमाच्या नियोजनासाठी व यशस्वीतेसाठी मूल्यमापन शिकण्याचा प्रत्यक्ष संबंध आहे, असे मत 100% माध्यमिक शिक्षकांनी नोंदवले.

4. बी. एड अभ्यासक्रमातील शैक्षणिक तंत्रज्ञान या विषयाचा माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाशी कसा संबंध आहे? या प्रश्नासाठी पुढील प्रमाणे प्रतिसाद मिळाला -

आम्ही आमच्या दैनंदिन अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर करतो. ते साधन कसे वापरावे? कोणते वापरावे? प्रयोग कसा करावा ? या सर्वांचे ज्ञान शैक्षणिक तंत्रज्ञानामुळे झाले असा बी. एड शी थेट संबंध आहे असे मत 100% शिक्षकांनी नोंदवले मात्र शैक्षणिक साधनांच्या वापरात आळस केला जातो असे मत 50 % शिक्षकांनी नोंदवले.

5. बी. एड माहिती तंत्रज्ञान या विषयाचा माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाशी कसा संबंध आहे ? या प्रश्नासाठी पुढील प्रमाणे प्रतिसाद मिळाला-

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

माहिती तंत्रज्ञान हा विषय इयत्ता 5 वी पासूनच झाला आहे. तो विषयच आम्ही शिकवतो तसेच संगणकाचा अध्यामरात वापर फार वाढला. सर्व माहिती कागदावर ठेवण्यापेक्षा आम्ही संगणक वापरत आहे. हा माहिती तंत्रज्ञानाचा थेट वापर आहे, असे मत 100% शिक्षकांनी नोंदविले मात्र संगणक वापरात अडचणी असल्याचे 50% शिक्षकाने नोंदविले.

6. बी. एड मधील विविध अध्यापन पद्धतीचा माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाशी कसा संबंध आहे ? या प्रश्नासाठी पुढील प्रमाणे प्रतिसाद मिळाला -

विविध अध्यापन पद्धतींचा प्रत्यक्ष अध्यापन करताना वापर आम्ही करतो आहे . असा संबंध आहे, असे मत 100% माध्यमिक शिक्षकांनी नोंदवले.

7. बी. एड मधील विविध प्रात्यक्षिकांचा माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाशी कसा संबंध आहे ? या प्रश्नासाठी पुढील प्रमाणे प्रतिसाद मिळाला -

सराव पाठ, छात्रसेवाकाल, शैक्षणिक साधन निर्मिती कृती सत्र व्यक्तिमत्व विकासासाठी चालणारे विविध उपक्रम इत्यादी प्रात्यक्षिकांचा आमच्या दैनंदिन अध्यापनात वापर होत आहे . ज्या पद्धतीने आम्ही शिकलो त्याचाच वापर आम्ही करत आहोत अनुभवातून एखादा बदल होतो परंतु बी. एड मध्ये केलेल्याचा लाभ आहेच अशा प्रकारचे मत 90% शिक्षकाने नोंदवले, तर अनुभवातूनच जास्त फरक पडल्यास असे मत बाकीचे 10 % शिक्षकाने नोंदवले.

**संदर्भ ग्रंथ:-**

पंडित, बन्सी बिहारी *(2005)* शैक्षणिक कृती संशोधन पुणे, नूतन प्रकाशन.

कार्डिले वसंत व महाले, संजीवनी *(2002)* संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन नाशिक, य. च. म. मु. विद्यापीठ.

डॉ. जाधव मोहन, प्रा. भोसले आरती, प्रा. सरपोतदार प्राची *(2003)* भारतीय शिक्षणाचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

*Best J.W. and Khan J. V. (2008) Research in Education, New Delhi, Peasantries of India.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*